| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | — | ०४/०१/२०२५. |
| नोंदणी दिनांक | — | ०४/०१/२०२५. |
| घोषित दिनांक | — | ०८/०८/२०२५ |
| कालावधी | — | ० व ०७ म ०४ दि. |

**<u>५ वे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, गोंदिया यांच्या न्यायालयात</u>**
{पीठासीन अधिकारी एस. व्ही. चरडे}

**<u>हिंदु विवाह याचिका क्र. ४३/२०२५</u>**

**CNR No. MHGO02-000121-2025**

**<u>निशाणी— १७</u>.**

| | | |
|---|---|---|
| १. | **क्ष** | .... **<u>अर्जदार.</u>** |
| २. | **य** | |

**<u>हिंदू विवाह कायदयाचे कलम १३—ब अन्वये परस्पर सामंजस्याने विवाह विच्छेदनाकरीता</u>**

---

अर्जदारातर्फे कु. व्ही. के. जाधव, अधिवक्ता.

---

## <u>न्यायनिर्णय</u>

( दिनांक ०८/०८/२०२५ रोजी घोषित )

अर्जदार क्र. १ व २ यांनी हिंदू विवाह कायदयाचे कलम १३—ब अन्वये परस्पर सामंजस्याने विवाह विच्छेदन होवून मिळण्याकरीता याचिका दाखल केली.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार यांचा विवाह दिनांक ११.०१.२०२३ रोजी हिंदु जातीरिवाजाप्रमाणे सताना, मध्यप्रदेश येथे झाला. त्यांच्या आपसी मतभेदांमुळे वैवाहीक जीवन जगणे अशक्य झाले. अर्जदार क्र. १ ही नोव्हेंबर २०२३ पासून अर्जदार क्रमांक २ पासून तिच्या माहेरी राहाते आहे. अर्जदार हे एकमेकांविरूद्ध कुठलेही प्रकरण न्यायालयात दाखल करणार नाही. सदर वाद विकोपाला गेल्याने व भविष्यामध्ये ते एकत्र सुखाने नांदु शकत नाही असे त्यांचे मत झाल्याने त्यांनी परस्पर सामंजस्याने विवाह विच्छेदन करण्यात यावा याकरीता विनंती केली आहे.

३. वरील वस्तुस्थितीवरून खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झााले त्यावर कारणमीमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे दिले आहेत.

| ***अनु क्र.*** | ***मुद्दे.*** | ***निष्कर्ष.*** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे परस्पर सामजस्याने घटस्फोट मिळण्याकरीता पात्र आहेत काय? | **होकारार्थी.** |
| २. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**कारणमिमांसा**

४. **मुद्या क्र. १ व २ करीता :—** परस्पर सामंजस्याने विवाह विच्छेदनाकरीता अर्जदार यांनी त्यांचा पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. १० व १२ अन्वये दाखल केले. नि. क्र. १३ वर लग्नपत्रिका, नि.क्र. १४ वर अर्जदाराचा विच्छेदन करारनामा, अर्जदार क्रमांक १ चे आधार कार्ड नि.क्र. १५ अर्जदार क्रमांक १ चे आधार कार्ड व नि.क्र. ११ अर्जदार क्रमांक २ चे आधार काड दाखल केले आहे. अर्जदार आपल्या शपथपत्रात अर्जातील मजकूराप्रमाणे कथन करतात. त्यांच्या

साक्षीपुराव्यावरून असे निर्दशनास येते की, अर्जदार यांचे वैचारीक मतभेद असल्यामुळे ते एकत्र राहु शकत नाही व त्यांनी परस्पर सामंजस्याने विवाह विच्छेदन करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्जदार हे एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन वेगवेगळे राहत आहेत. त्यांनी त्यांचेमधील सर्व वादाचे मुद्दे चर्चेने सोडविलेले आहेत. दोन्ही पक्षकार हे कोणत्याही परिस्थितीमध्ये एकत्र नांदु शकत नाही हे त्यांच्या पुराव्यावरून स्पष्ट होते. दोन्ही पक्षकारांनी प्रस्तुत प्रकरण स्वेच्छेने दाखल केल्याचे निर्दशनांस येते. त्यांनी परस्पर सामंजस्याने विवाह विच्छेदन करण्याचा निर्णय घेतला आहे. सबब, अर्जदार हे परस्पर सामंजस्याने घटस्फोट घेण्याकरीता पात्र आहेत. म्हणुन **मुद्या क्रमांक १ करीता माझे उत्तर होकारार्थी** आहे. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो :—

| : **आदेश** : | |
|---|---|
| **१.** | अर्जदार यांचा दिनांक ११.०१.२०२३ रोजी झालेला विवाह कलम १३—ब हिंदू विवाह कायदा १९५५ नुसार निकालाचे तारखेपासून विच्छेदित झाल्याचे घोषीत करण्यात येते. |
| **२.** | अर्जदारांनी आप—आपला खर्च सोसावा. |
| **३.** | येणेप्रमाणे हुकूमनामा काढण्यात यावा. |
| **४.** | अर्जदारांची ओळख गुपित राहण्यासाठी न्यायनिर्णय अपलोड करतांना त्यांना **क्ष** व **य** नावाने संबोधण्यात यावे. |

Digitally signed by SULABHA VIJAY CHARDE
Date: 2025.08.08 16:37:12 +0530

**स्थळः गोंदिया.** **( एस. व्ही. चरडे )**
**दिनांकः ०८/०८/२०२५.** **५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, गोंदिया.**